## (फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची इ. सन २००७-०८ (१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८) ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २२ मार्च २००९ रोजी सकाळी ११.३० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाटयमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.
२. परिषदेच्या १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
४. इ.सन २००९-१० या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे.
५. इ.सन २००८-०९ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. नाटयसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
७. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
८. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

आपला,

(प्रदीप कबरे)
प्रमुख कार्यवाह.

## विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. १६ मार्च २००९ ते १९ मार्च २००९ पर्यंत प्रतिदिनी सायं. ६ ते ८ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. ९ मार्च २००९ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक ९ मार्च २००९ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल.
५. ज्या सभासदांचे पत्ते बदलले आहेत त्यांनी कृपया आपला नवीन पत्ता कळवावा.

### महत्त्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) बारा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास भरमसाठ वाढलेला टपाल खर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी केवळ अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाटय संमेलन, सत्कार आणि अन्य नाटय विषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.